**पूर्वसेवा जोडून देण्याबाबत.**
**श्री. नितीन कोंडबाजी रतनवार, प्रबंधक,**
**शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन आदेश क्र. पूसेज-३९२६/प्र.क्र.०७/२६/ई-१५६१९१४/तांशि-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ०२ एप्रिल, २०२६.

**संदर्भ :-**

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.३२०/सेवा-४, दि.१३/११/२०२०.
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. ५/तंशिसं/रतनवार/से.सं/२०२५/२५९, दि.०४/१२/२०२५.

**<u>प्रस्तावना:-</u>**

श्री. नितीन कोंडबाजी रतनवार यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीनुसार प्रबंधक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय तंत्रनिकेतन प्रशासकीय सेवा गट- ब पदावर शासन निर्णय क्र. एससीटी-६५१३/प्र.क्र.१५/१३/तांशि-१, दि.२७/०७/२०१६ अन्वये शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद येथे नियुक्ती करण्यात आली आहे. सदर पदावर रुजु होण्यापूर्वी श्री. रतनवार हे राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या आस्थापनेवरील सहाय्यक गुप्त वार्ता अधिकारी या पदावर दि.०१/०१/२००९ पासून व दि.३१/१२/२०१५ पासून गुप्तवार्ता अधिकारी या पदावर कार्यरत होते. तसेच सदर पदाचा परिविक्षाधीन कालावधी त्यांनी पूर्ण केला आहे.

श्री. रतनवार यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रबंधक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय तंत्रनिकेतन प्रशासकीय सेवा गट-ब (वर्ग-२ राजपत्रित) या पदासाठी विहीत मार्गाने अर्ज सादर केलेला होता. सदर पदाच्या मुलाखतीस हजर राहण्याबाबत राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र दि.१२/०६/२०१५ अन्वये श्री. रतनवार यांना परवानगी देण्यात आली आहे.

श्री. रतनवार यांना राज्य गुप्तवार्ता विभाग, केंद्र यवतमाळ यांचे आदेश क्र.२ प्रशा./२०१६-१२१२ दि.२४/०८/२०१६ नुसार प्रबंधक पदावर रुजू होणेसाठी दि.२४/०८/२०१६ (म.नं.) कार्यमुक्त करण्यात आले. त्यानुषंगाने श्री.रतनवार दि.२५/०८/२०१६ रोजी (म.पू.) रोजी प्रबंधक पदावर रुजू झाले आहेत. श्री. रतनवार यांनी ज्या संस्था/ कार्यालयांमध्ये सेवा केली आहे ती दोन्ही कार्यालये शासकीय असून त्यांच्या शासकीय सेवेत कोणताही खंड नाही.

श्री. रतनवार यांची सहाय्यक गुप्त वार्ता अधिकारी व गुप्तवार्ता अधिकारी, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य या पदाची पूर्वसेवा प्रबंधक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय तंत्रनिकेतन प्रशासकीय सेवा, गट-ब या पदाच्या सेवेस जोडून देण्याबाबतचा प्रस्ताव संचालनालयाने संदर्भाधिन क्र. ०२ येथील पत्रान्वये सादर केला आहे. त्याअनुषंगाने श्री. रतनवार यांची पूर्वसेवा जोडून देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**<u>शासन आदेश :-</u>**

श्री. नितीन कोंडबाजी रतनवार हे सन २००५ नंतर शासकीय सेवेतील विचाराधीन दोन्ही पदावर रुजु झाले असल्याने वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि.१२/०१/२००७ मधील तरतुदीनुसार त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू असून त्यांचे राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य येथील सेवार्थ खाते प्रबंधक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय/ शासकीय तंत्रनिकेतन प्रशासकीय सेवा, गट-ब या पदाच्या सेवार्थ प्रणालीला जोडण्यात आले आहे.

०२. त्याअनुषंगाने वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.३२०/सेवा-४, दि.१३/११/२०२० मधील तरतुदी नुसार श्री. रतनवार यांचा पूर्वीचा सेवा कालावधी केवळ त्यांच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या खात्यात जमा असलेल्या रकमेपुरताच जोडून देण्यास या शासन आदेशाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

०३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४०२१८१४२७१८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT TATOBA KUNDLE

Digitally signed by AJIT TATOBA KUNDLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=e8d77478a97d2485b55f7fc94d7932346a883cbe88fedf8ca544b731a7db9fb6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4865016DE0AB999E5364A36B2DA1F9AD227B8C0EB513CD7E59305D7539B1F9CA, cn=AJIT TATOBA KUNDLE
Date: 2026.04.02 18:15:35 +05'30'

**( अजित कुंडले )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

श्री. नितीन कोंडबाजी रतनवार, प्रबंधक, शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत).

**प्रति,**

१. संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती,
३. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ,
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर,
५. जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ,
६. निवडनस्ती/तांशि-१.